महासागर अमरावती
शुक्रवार दि. 27 सप्टेंबर 2024
पान 3



# 1420 कोटी रूपयांतून दर्जेदार विकासकामे होणार- उपमुख्यमंत्री अजित पवार

- विविध विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन
- वाढीव कराबाबत ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही





महासागर प्रतिनिधी

**प्रतिनिधी,( दि. 26 )–** अमरावती शहर आणि परिसराच्या विकासासाठी भरघोस निधी देण्यात आला आहे. यातून शहराच्या वैभवात भर पडणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण होतील. एकाच दिवशी 1420 कोटी रूपयांच्या कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले आहे. ही कामे दर्जेदार होण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

जिल्हा नियोजनच्या सभागृहात आज विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार सुलभा खोडके, विभागीय आयुक्त डॉ. निधि पाण्डेय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख?य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, मुख्य अभियंता गिरीश जोशी, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता रुपा गिरासे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, शासनाला उत्पन्न देणाऱ्या विभागांकडून मोठ्या प्रमाणावर कर गोळा करण्यात येत आहे. या विभागांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहे. विकासकामे करताना पुढील काळाचा विचार ठेवण्यात आला आहे. सारथी संस्थेमध्ये 300 आसन क्षमतेचे श्रोतागृह मंजूर आहे. मात्र याठिकाणी 500 विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय राहणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व सारथीच्या ठिकाणी आता 500 क्षमतेचे श्रोतागृह राहणार आहे. यासाठी लागणारा अतिरिक्त निधीही देण्यात येणार आहे. एकाच दिवशी 1420 कोटी रूपयांच्या विविध कामांचे लोकार्पण, भूमिपूजन करण्यात आले आहे. या सुविधांचा नागरिकांना लाभ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. अमरावती महापालिकेकडून वाढीव दराने कर आकारणी केली आहे. त्यामुळे तात्काळ सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करून नागरिकांना करपावत्या देण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत ऑक्टोबरपर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश दिले. सर्व घटकांचा विकास होण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. त्याचा भाग म्हणून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, मुलींना मोफत शिक्षण, बारावीनंतर विद्यावेतन, शेतकऱ्यांना मोफत वीज, दुधाला अनुदान, तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यात येत आहे.

सारथी, बार्टी सारख्या संस्था उभारून अध्ययनासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यात येत आहे. त्यासोबतच विभागीय स्तरावर चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सुविधांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा. खाशबा जाधव यांच्यानंतर यावर्षी राज्यातील खेळाडूने वैयक्तिक पदक प्राप्त केले आहे. खेळाडूंना तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळाल्यास भविष्यात पदक मिळवणारे खेळाडू राज्यातून तयार होतील, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. विभागीय, जिल्हा आणि तालुका क्रीडा संकुलासाठी निधी वाढवून देण्यात आला आहे. त्यामुळे या क्रीडा सुविधा प्राधान्याने उभ्या राहतील. अमरावती येथील पाणी पुरवठ्याची अमृत योजना, सारथीचे विभागीय कार्यालय, वसतिगृह, अभ्यासिका, लालखडी रेल्वे उड्डाणपूल, चांगापूर फाटा रस्ता, विभागीय क्रीडा संकुल मैदानाचे भूमिपूजन तर जिल्हा स्त्री रूग्णालयाच्या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले आहे. त्यासोबतच वस्तू व सेवा कर इमारतीचे नुतनीकरण, विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील क्रीडा सुविधा, उत्पादन शुल्कच्या इमारतीचे उद्घाटन, वडाळी उद्यान सौंदर्यीकरणाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच नगरोत्थान अभियानातील कामांचे ऑनलाईन भूमिपूजन करण्यात आले. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले. उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांनी आभार मानले.

# बस अपघातातील मृतकांची संख्या पाच वर

## आणखी एका शिक्षकाचा मृत्यू



महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.26 )–** चिखलदरा पोलीस स्टेशनअंतर्गत सेमाडोह लगतच्या कमान पूलावर सोमवारी(दि.23) सकाळी 8.30 ते 9 वाजताच्या सुमारास खासगी बस पुलावरुन नाल्यात कोसळल्याने धारणीतील दोन महिला डॉक्टरसह चौघांचा मृत्यू झाला होता, तर 32 प्रवासी गंभीर जखमी झाले होते. गुरुवार (दि.26) रोजी यामधील आणखी एका शिक्षकाचा मृत्यू झाला. यामध्ये अजूनही 7 प्रवाश्यांची प्रकृती चिंताजनक आहे. एका शिक्षकावर बेशुध्द अवस्थेत उपचार सुरु आहे.

मनोहर पवार (वय 45 रा.कांडली, परतवाडा) असे या अपघातातील मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षकांचे नाव आहे. पवार हे धारणी तालुक्यातील खापरखेडा येथील विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत होते. पवार यांच्यावर अपघातानंतर अचलपुर येथील प्रथम उपजिल्हा रुग्णालय त्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालय त्यानंतर अमरावती एका खाजगी रुग्णालयात त्यांना भरती करण्यात आले होते. तेथे त्यांच्यावर दोन वेळा शस्त्रक्रियासुद्धा करण्यात आली होती, परंतु त्यांची प्रकृतीमध्ये सुधारणा होत नसल्याने त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना हैदराबाद येथे नेण्याचा निर्णय घेतला होता.

हैदराबाद येथे उपचारासाठी नेत असताना त्यांच्या यवतमाळ नजीक रस्त्यावर मृत्यू झाला. त्याचे पोस्टमार्टम यवतमाळ येथे करण्यात येणार असल्याची माहिती चिखलदरा पोलिसांकडून देण्यात आली. सोमवारी एमपी 12/ पी.1555 क्रमांकाची चावला कंपनीची ही बस नेहमी प्रमाणे सकाळी 6 वाजता अमरावती येथून मध्यप्रदेशातून खंडवा जाण्याकरिता निघाली.

नेहमी अपडाऊन करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकरिता धारणी जाण्याकरिता ही नेहमीचीच बस आहे. सोमवार असल्याने शनिवारी आपल्या घरी आलेले शासकीय अधिकारी, कर्मचारी या बसने कार्यालयीन वेळेत पोहोचण्याच्या प्रयत्नात नेहमीप्रमाणे या बसने धारणीकरिता निघाले होते. शासकीय कर्मचाऱ्यांसह इतर प्रवासी पकडून यावेळी 48 जण या बसमध्ये होते. घटांग येथे बसचा टायर पंचर झाल्याने वेळेत पोहोचण्याच्या नादात चालक बस भरधाव चालवित होता. मात्र ब्रिटीशकालीन कठळे असलेल्या पुलावर वेगवान बस अनियंत्रित होवून थेट नाल्यात कोसळली. ज्यामध्ये चालकाच्या बाजूने बसलेल्या प्रवाशांपैकी चार प्रवासी जागीच ठार झाले होते.

# चारचाकीची दुचाकीला धडक, एक गंभीर, दोन जखमी

## श्रीक्षेत्र पाळा ते भिवकुंडी रोडवरील घटना



महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 26 )** श्रीक्षेत्र पाळा ते भिवकुंडी रोडवर टाटा एक्स पिकअप व दुचाकीत समोरासमोर झालेल्या धडकेत एक युवक गंभीर जखमी झाला, तर अन्य दोघे किरकोळ जखमी झाले. गंभीर जखमीला प्रथम मोर्शीतील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतू त्यानंतर त्याला अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले. दोघांचा इलाज मोर्शी रुग्णालयात सुरू आहे. ही घटना आज दि. 26 सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजताचे सुमारास घडली.

पोलीस सूत्रानुसार मारुती बिसन धुर्वे (32) व विशाल बस्तीराम युवने (21) व सागर राजेश कुमरे (19, तिन्ही रा. धारूड, ता.आठनेर, जि.बैतूल) हे तिघे धारूड येथून दुचाकी क्रमांक एम एच 27 झेड 5515 ने भिवकुंडी मार्गे पाळा येथे मजुरीकरिता जात होते. दरम्यान पाळा येथून विरुद्ध दिशेने भरधाव येणार्या टाटा एक्स पिकअप क्र.एम एच 42 बी 5296 ने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या घटनेची माहिती युवा उद्योजक नवीनकुमार पेठे यांना दूरध्वनीवरून कळताच त्यांनी तात्काळ आपल्या न्यू जनरेशन केअर फाउंडेशनची ?म्बुलन्स घटनास्थळी रवाना केली व अपघातात गंभीरित्या जखमींना उपजिल्हा रुग्णालय दाखल करण्यात आले. रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णांवर प्रथमोपचार केल्यानंतर मारुती बिसन धुर्वे याला अतिशय गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशाल बस्तीराम युवने व सागर राजेश कुमरे यांना किरकोळ मार लागल्यामुळे त्यांना दवाखान्यातून सुट्टी देण्यात आली. मारुती किसन धुर्वे यांच्या खांद्याचे हाड पूर्णत- बाहेर आल्यामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयात त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. यावेळी सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणार्या तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे व त्यांच्या टीमने रुग्णास मदत करण्याची मोलाची कामगिरी पार पाडली. याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर यांनी घटनास्थळी जाऊन टाटा पिकअप व चालकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

# सात महिन्यांत 180 शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## कधी थांबेल हे सत्र



महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.26 ) –** सातत्याने दरवर्षी येणारी नैसर्गिक आपत्ती, शेतीतील घटणारे उत्पादन, शेतमालाला मिळणारा कमी दर यामुळे वाढलेली कर्जफेडीची चिंता, अतिवृष्टी, सततचा पाऊस व आर्थिक अडचण जून त्यामुळे आलेले नैराश्य यामुळे जिल्ह्यात ऐन खरीप हंगामाच्या साडेतीन महिन्यांत 55 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. जूनमध्ये 18, जुलैमध्ये 19, ऑगस्टमध्ये 18 आत्महत्या झाल्या.

### जिल्ह्यातील महिनानिहाय आत्महत्येची आकडेवारी

| | |
|---|---|
| जानेवारी | – 22 |
| फेब्रुवारी | – 26 |
| मार्च | – 35 |
| एप्रिल | – 22 |
| मे | – 20 |
| जून | – 18 |
| जुलै | – 19 |
| ऑगस्ट | – 18 |

2024 चा खरीप हंगाम अर्धा संपला आहे. यात मूग, उडीद, सोयाबीन ही पिके पूर्णतः हातून गेली. आता कपाशी व तूर पीक तेवढे बाकी आहे. ही दोन्ही पिके आजच 60 टक्के हातून गेल्यातच जमा आहेत. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. अशातच जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत जिल्ह्यात 180 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे तालुक्याचे धगधगते वास्तव आहे. यात सप्टेंबरमध्ये झालेल्या शेतकरी आत्महत्यांचा समावेश नाही.

### जिल्ह्यात 180 पैकी फक्त 65 आत्महत्या मदतीस पात्र

- जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत जिल्ह्यात 180 शेतकरी आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत. यापैकी फक्त 65 आत्महत्या शासनाच्या मदतीस पात्र ठरविण्यात आल्या.
- पात्रपैकी 49 आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदत देण्यात आली आहे. आत्महत्येची 82 प्रकरणे प्रलंबित आहेत, तर 33 प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

# जिल्हा बँकेचे सभागृह बनले बर्थडे हॉल

## व्यवस्थापकाच्या वाढदिवसानिमित्त बँकेचे कामकाज ठप्प

### फटाक्यांच्या आतिषबाजीने शांतता केली भंग



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.26 ) –** महिला कर्मचाऱ्यांकडून स्वत:चे औक्षवंत करून घेत जिल्हा बँकेच्या व्यवस्थापकाने आपला वाढदिवस मोठा धुमधडाक्यात साजरा करून घेतला. इतिहासात पहिल्यांदाच शेतकऱ्याच्या बँकेत व्यवस्थापकाच्या वाढदिवसा निमित्ताने फटाक्यांची आतिषबाजी आणि सभागृहात केक कटिंग चा कार्यक्रम व साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त तब्बल एक तास जिल्हा बँकेचे काम ठप्प होते. या प्रकारामूळे जिल्हा बँकेचे सभागृह बर्थडे हॉलमध्ये रुपांतरित झाले होते.

या कृत्याचा शेतकऱ्यांसह बँकेच्या ग्राहकांनी निषेध केल्याची माहिती आहे.

दि. 25 सप्टेंबर रोजी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री बकाल साहेब यांचा वाढदिवस बँकेचे मुख्य कार्यालय येथील सभागृहात पार पडला. सदर वाढदिवसाच्या कार्यक्रमाला मुख्य कार्यालयातील तसेच मुख्य शाखा व कॉटन शाखा येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम दुपारी 11 ते 12 च्या दरम्यान करण्यात आला. कार्यक्रमानिमित्त सभागृहाला फुलांनी सजविण्यात आले होते, तसेच वाढदिवसाच्या कार्यक्रमानिमित्त फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. महिला कर्मचाऱ्यांकडून बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बकाल यांना ओवाळण्यात आले. औक्षवण करण्यात आले. सर्व कर्मचाऱ्यांनी आपापले काम सोडून एक तासासाठी बँक बंद ठेवून सभागृहात कार्यक्रमाला हजर होते. वाढदिवसानिमित्त सर्व कर्मचारी तसेच महिला कर्मचारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पाया पडत होते. हा खेळ बँकेच्या वेळेत चालू होता. ही बँक शेतकऱ्यांची असून ह्या सभागृहात शेतकऱ्यांसाठी त्यांच्या हितासाठी नेहमी गाजली गेली. ह्या सभागृहात बँक स्थापन झाल्यापासून सर्व अध्यक्षांचे कार्यकाळ झाला पण असा हैदोस कोणत्याच अधिकाऱ्यांना केला नसल्याचे काही सदस्याचे म्हणने. हे सभागृह शेतकऱ्यांचे दलितांचे सभासदांचे बँकेचे भाग भांडवलदाराचे असून आतापर्यंत या सभागृहात सतत शेतकऱ्यांचा लढा झाला, परंतु आज या सभागृहाचे रूपांतर बर्थडे हॉलमध्ये झाले. हे खेदजनक आहे. शेतकऱ्यांची बँक असलेल्या सभागृहात हा किळसवाणा प्रकार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बकाल तसेच बँकेचे कार्यकारिणी अधिकारी व संगणक अधिकारी दामले, तसेच बँकेचे इस्टेट अँड प्रॉपर्टी अधिकारी कोहळे यांनी घडवून आणला अशी माहिती आहे.

# चारचाकीच्या वाहनचालकाला मारहाण

**अमरावती –** एका महिलेच्या दुचाकीला धक्का लागल्याच्या कारणावरून चारचाकी वाहनाच्या चालकाला तीन ते चार अज्ञातांनी बेदम मारहाण केली. ही घटना नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जमिल कॉलनीत चौकात घडली. या घटनेची तक्रार पंजाबराव महादेव वाघमारे (54, रा. मारकडा, ता. दर्यापूर) यांनी 25 सप्टेंबर रोजी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी तीन ते चार अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला.

**Change Of Name**

I Akotkar Sonu Dhaneshwarrao R/o Ward No 02 At Kusumkot Bk have changed my Name to Sonu Sagar Kalaskar for all future purposes.

**कार्यालय नगर परिषद चांदूर रेल्वे**

**निविदा सुचना**

**सन २०२४-२५ करीता**

चांदूर रेल्वे नगर परिषदेद्वारा द्वि लिफाफा पद्धतीने खालील नमूद कामाकरीता सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक निविदा धारकाला कोरे निविदा फॉर्म दि. २७/०९/२०२४ ते २/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अनामत रक्कम जमा करून रोखपाल यांचे कडून प्राप्त करून घेता येईल. निविदा धाराकांनी सिलबंद पाकीट १ मध्ये रजिस्ट्रेशन व इतर अनुषंगीक कागदपत्रे व पाकीट क्र. ०२ मध्ये दर नमूद करून सादर करावे.

निविदा दि. ४/१०/२०२४ ला ५.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अनामत रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | नगर परिषद कार्यालयाअंतर्गत घर पट्टी व पाणी पट्टी कराचे बिल वाटप करणेबाबत. | २०००/- | २००/- |

शर्ती व अटी कार्यालयात पाहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
नगरपरिषद चांदूर रेल्वे

जा.क्र. ५७७/नपचारे/कर वि/२०२४ दि. २६/०९/२०२४

**ई-निविदा सूचना क्रमांक- १० ( २०२४-२५ ) प्रथम वेळ**

उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा (दूरध्वनी क्रमांक ०७२२३-२२०२१४) हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ६ काम अंदाजित रक्कम रू. २२,६७,९०६/- करिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवीत आहेत. कामाची सविस्तर निविदा सूचना व कोरे निविदा फॉर्म ००० या संकेतस्थळावर दिनांक २७/०९/२०२४ ते ०४/१०/२०२४ पर्यंत सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ई-निविदा उघडण्यात दिनांक ०७/१०/२०२४ राहील. इच्छुक कंत्राटदारांनी सविस्तर सुचनेकरिता https://mahatenders.gov.in व https://www.mahaforest.nic.in या संकेत स्थळावर संपर्क साधावा.

जा.क्र. : कक्ष/मेव्याप्र/सिपना/योजना/९१९/२०२४-२५ दिनांक २४/०९/२०२४

( दिव्याभारती एम. भा.व.से. )
उपवनसंरक्षक,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
सिपना वन्यजीव विभाग,
परतवाडा

वि.मा.का./अम./जाहि./५२३/२०२४-२०२५

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# परतवाडा पोलीस स्टेशनमधील 'संगीत खुर्ची' थांबली!

## अखेर ठाणेदार पदी सुरेश मस्के आरुढ ■ 'दैनिक महासागर' च्या पाठपुराव्याला यश


महासागर
पोलीस निरीक्षकांच्या बदलीत एसपींकडून भेदभाव?
कुणाची न्यायासाठी धाव, तर कुणाची गुंडाळी जशीच्या तशी ■ ग्रामीण पोलीस दलातील बदल्या चर्चेत
अधीक्षकांना ठेवले जाते अंधारात
ठाणेदार चव्हाणांची बदली चर्चेत
महासागर
एलसीबीची परतवाडा हद्दीत कारवाई!
■ठाणेदारच नाही, नोटीस कुणाला बजाविणार?
ग्रामीण पोलीस दलातील अधिकाऱ्यांमध्ये अस्थैर्य?
अधिकारी मॅटमध्ये, पोलीस निरीक्षकांमध्ये नैराश्याचे
फक्त चव्हाणांनाच सॉफ्ट कॉर्नर का?
जिल्ह्याकडे पालकमंत्र्यांची पाठ?

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )**- मागील अनेक दिवसांपासून अमरावती ग्रामीण पोलीस दलातील परतवाडा पोलीस स्टेशनला कायमस्वरूपी ठाणेदार नसल्याने येथील 'संगीत खुर्ची' सुरु होती. एका बाजुने ठाणेदार संदीप चव्हाण आणि दुसऱ्या बाजूने इतर ठाणेदार या पध्दतीने सुरु असलेली ही 'संगीत खुर्ची' अखेर थांबल्याचे दिसत आहे. पोलीस अधिक्षकांनी या ठिकाणी ठाणेदार पदी सुरेश मस्के यांची नियुक्ती केल्याने संदीप चव्हाणा यांना आपल्या वाहतूक शाखेत परत जावे लागले. 'दैनिक महासागर' ने परतवाडा पोलीस स्टेशनमध्ये ठाणेदारांच्या रिक्त पदामूळे होत असलेला प्रकार मांडल्यावर पोलीस अधिक्षकांनी निर्णय घेत नविन ठाणेदार सुरेश मस्के यांची नियुक्ती केली.

ठाणेदारांच्या रिक्त पदांमूळे परतवाडा ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. नियमित ठाणेदार मिळावे अशी मागणी होत असताना देखील वरिष्ठांकडून याकडे दुर्लक्ष होत होते. परंतू 'दैनिक महासागर' ने वारंवार वृत्त प्रकाशित ही बाब वरिष्ठांच्या लक्षात आणून दिली. अचलपूर वाहतूक शाखा आणि परतवाडा ठाणेदार पदाचा कार्यभार हा तदर्थ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्याकडे होता. मात्र दि.24 सप्टेंबरला ग्रामीण पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी परतवाडा पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक सुरेश मस्के यांची नियुक्ती केल्याने परतवाड्याला आता कायमस्वरूपी ठाणेदार मिळाले.

### हस्तक्षेप होवू नये ?

आता अचलपूर वाहतूक शाखेचा कारभार देखील परतवाडा पोलीस ठाण्यातून सुरू आहे. या ठिकाणी पोलीस निरीक्षक सुरेश मस्के आणि तदर्थ पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण एकाच ठिकाणी असल्याने एकमेकांच्या कामात हस्तक्षेप होणार नाही याची काळजी वरिष्ठांना घ्यावी लागेल.

### क्षमतेपेक्षा अधिक स्टाफ

परतवाडा पोलीस स्टेशन ला कार्यरत अनेक कर्मचाऱ्यांच्या बदल्या विविध ठिकाणी झाल्या आहे. असे असतानाही अनेक दिवसांपासून या कर्मचाऱ्यांना सोडण्यात आले नाही. त्यामूळे क्षमतेपेक्षा अधिक कर्मचारी परतवाडा पोलीस स्टेशनला आहे. आता नविन ठाणेदार या कर्मचाऱ्यांना सोडतील का? असा प्रश्न उद्भवत आहे.

# अचलपुर उपविभागात पोलीसाचे कोम्बींग ऑपरेशन

## गुन्हेगारांवर वचक, कायदा-सुव्यवस्था सुरळीत



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर,( दि.26 )** - अमरावती ग्रामीण विभागात सार्वजनिक उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी अचलपुर उपविभागात मोठ्या प्रमाणात कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले.

या ऑपरेशनमध्ये अचलपुर, परतवाडा आणि सरमसपुरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हेगार आणि संशयित व्यक्तींच्या राहत्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखा आणि आरसीपी पथकाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत भाग घेतला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक, आणि उप-विभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अचलपुर, परतवाडा, सरमसपुरा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी ही कारवाई केली.

### परतवाडा पोलिसांकडून तिघांवर कारवाई

परतवाडा हद्दीत संशयास्पद हालचाली करताना तीन आरोपींवर कलम 122 महा.पो.का. अंतर्गत कारवाई करण्यात आली. ज्यामध्ये नरेश फुलचंद झारखंडे, (वय 28, रा. येणीपांढरी), कार्तिक प्रभाकर शिंपी, (वय 19, रा. परतवाडा), अनिकेत राजु नाहारकर, (वय 24, रा. परतवाडा) यांचा समावेश आहे.

### सरमपूरा पोलिसांकडून दोघे अटकेत

सरमसपुरा हद्दीत महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या उल्लंघनाच्या आरोपाखाली दोन आरोपींना अटक करण्यात आली. प्रमोद चि.पुरोहित (रा.हीरापुरा, सरमसपुरा), दादाराव सा.वानखडे (रा.मेहराबपुरा, सरमसपुरा).

# छायाचित्रकारांच्या हक्काचे व्यासपीठ सोहळा मैत्रीचा

## ■अमरावती जिल्ह्यातूनही अनेक छायाचित्रकार होणार सामील■




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - चार वर्षांपूर्वी चार-पाच मित्र एकत्र येऊन सोहळा मैत्रीचा क्षण आठवणीचे हा एक आगळावेगळा कार्यक्रम सुरू करण्यात आला. आज हा कार्यक्रम भारतभरातील छायाचित्रकारांचे हक्काचे व्यासपीठ बनला आहे. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील चारठाणा येथील श्री क्षेत्र भवानी मंदिर येथे या वर्षीही रविवार 29 सप्टेंबर रोजी हा कार्यक्रम पार पडणार आहे, ज्याला अमरावती जिल्ह्यातून अनेक छायाचित्रकार उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाला पहिल्या वर्षी जवळपास 1 हजार फोटोग्राफर व्हिडिओ ग्राफर बंधू भगिनी यांची उपस्थिती होती. नेमका हा कार्यक्रम कशासाठी घेतल्या जातो, यामागील उद्देश समजून महाराष्ट्रातील फोटोग्राफर व्हिडिओग्राफर यांनी सोहळा मैत्रीचा हा कार्यक्रम जणू डोक्यावर घेतला. फक्त व्हाट्सअप डिझाईन तयार करून ती फोटोग्राफरच्या ग्रुप वर व्हाट्सअप च्या माध्यमातून इंस्टाग्राम च्या माध्यमातून फेसबुकच्या माध्यमातून फोटोग्राफर-व्हिडिओग्राफरपर्यंत पोहोचविल्या जाते. कुठलेही आग्रहाचे निमंत्रण न देता या एका छोट्या सोशल मीडियाच्या माध्यमातून या कार्यक्रमाला गेल्या चार वर्षात महाराष्ट्र मध्य प्रदेश, दिल्ली, हरियाणा, यासह अनेक राज्यातून या कार्यक्रमाला फोटोग्राफर, व्हिडिओ ग्राफर जवळपास पंधरा ते वीस हजार उपस्थित दर्शवितात. जास्तीत जास्त फोटोग्राफर, व्हिडीओग्राफरने या सोहळ्याला उपस्थिती राखावी असे आवाहन मनीष जगताप फोटोग्राफर अमरावती यांनी केले आहे.

**या फोटोग्राफरने सुरू केला सोहळा**

हा सोहळा मुक्ताईनगर तालुक्यातील कुऱ्हा येथील विनोद चौधरी, मलकापूर येथील योगेश शर्मा, बुलढाणा दिगांबर जाधव, रविकिरण टाकळकर व इतर फोटोग्राफर्सने सुरु केला आहे.

# 7 व्या अमरावती मॅरॉथान चे आयोजन उद्या

## ●3 हजार पेक्षा जास्त धावक होणार सहभागी●



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - अमरावती मॅरॉथॉन असोशिऐशन व्दारे रविवार दि. 29 सप्टेंबर 2024 रोजी 7 व्या अमरावती मॅरॉथन चे आयोजन करण्यात येत असून, या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्हयांमधून तसेच महाराष्ट्राबाहेरील 3 हजार पेक्षा जास्त धावकांनी सहभाग नोंदविला आहे.

मॅरॉथॉन चे मार्गात पंचावटी व इर्वीन चौक येथे महाजन डेकोरेशन यांच्या पुढाकारातून धावकांवर पुष्प वर्षाव करण्यात येणार आहे. सध्या ऑक्टोबर हीट जाणवत असल्याने धावकांचे शरीर थंड रहावे या करिता वाटर शॉवर सुध्दा ठेवण्यात येणार असून, धावकांचा उत्साह कायम राहण्यासाठी मॅरॉथॉनच्या मार्गात दोन ठिकाणी धावकांचे तुतारीने स्वागत होणार आहे. तसेच ठिकठिकाणी डीजेवर मधुर संगीत सुध्दा वाजवीण्यात येणार आहे, मॅरॉथॉन सुरु होण्यापुर्वी वार्मअप व्हावा यासाठी मॅरॉथॉनच्या स्टार्ट पॉईन्टला झुंम्बा चे आयोजन करण्यात येणार आहे. मॅरॉथॉनच्या मार्गात 7 त 8 ठिकाणी वाटर स्टेशन राहणार असून, याठिकाणी, एनरजेल, पाणी, खजूर, केळी, चॉकलेट, चिक्की ई. ठेवण्यात येणार आहे. धावमार्गात शारिरीक वेदनाशमक स्प्रे सुध्दा ठेवण्यात येणार आहेत. सदर मॅरॉथॉन सुरळीत पार पडावी म्हणून पोलीस आयुक्त हे ट्राफीक कंट्रोलची सेवा पुरविणार असून, परिवहन महामंडाळाने सुध्दा त्यांची सकाळची बस सेवा दुसऱ्या मार्गाने वळवून मॅरॉथॉन आयोजनासाठी मोलाचे योगदान देत आहे.

# चाकु कमरेत घेऊन फिरणाऱ्याला अटक

**अमरावती** - बडनेरा नवीवस्ती स्थित बसस्थानक परिसरात चाकू कमरेत घेऊन फिरणार्या एका आरोपीला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 25 सप्टेंबर रोजी रात्री अटक केली. इरफान खान रहेमान खान (36, रा. रहेमतनगर) असे आरोपीचे नाव आहे. पोलिस हवालदार दिपक सुंदरकर यांनी या घटनेची तक्रार बडनेरा पोलिस ठाण्यात दिली.

# शिवाजी संकुलातून दुचाकी लंपास

**अमरावती** - बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शिवाजी संकुलातून चोराने एमएच 40 एआय 3857 या क्रमांकाची दुचाकी लंपास केली. या घटनेची तक्रार अंकुश भास्करराव कालोकार (25, रा. चोपन, वाढोणा, ता. कारंजा, जि. वर्धा, ह.मु. शिवाजी संकुल, अकोली) यांनी या घटनेची तक्रार 25 सप्टेंबर रोजी बडनेरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# स्मार्ट यू ने शेतकऱ्यांना केले स्मार्ट

## शेतकऱ्यांना डिजीटल हिशोब देण्याचे दिले प्रशिक्षण





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - नागपूरातील 'स्मार्ट यू' ने 26 सप्टेंबर 2024 रोजी काठोरा.बु, ता. जि. अमरावती येथे एका विशेष कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमात डिजिटल शेती हिशोबावर कार्यशाळा घेऊन एक अनोखा पुरस्कार सोहळा पार पाडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्या शेतीचे हिशोब कसे ठेवायचे हे शिकवण्यात आले, तसेच गावातील यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सरपंच प्रवीण अळसपुरे यांनी आपल्या भाषणात डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपयोगावर भर दिला. 'स्मार्ट यू कृषी खाता' चे सह-संस्थापक हेमंत कोंडे यांनी या कार्यक्रमाचे नेतृत्व केले. त्यांनी शेतकऱ्यांना डिजिटल हिशोब ठेवण्याचे महत्त्व पटवून दिले. पुरस्कार सोहळ्यात सचिन महल्ले यांना 'मार्केट जागरूक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. प्रवीण अळसपुरे व गजेंद्र काळबांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. गावचे सरपंच प्रवीण अळसपुरे, उपसरपंच गजेंद्र काळबांडे, ग्रामपंचायत सदस्य विनोद भालेराव , लघुत्तमा धोटे (ग्रामसेवक काठोरा.बू), या सन्मान सोहळ्यात उपस्थित होते. कार्यशाळेत हेमंत कोंडे यांनी 'स्मार्ट यू कृषी खाता' व्हॉट्सअॅप बॉट कसे वापरायचे हे प्रत्यक्ष शिकवले. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडवून त्यांना डिजिटल हिशोबासच्या फायद्यांची माहिती दिली. 'स्मार्ट यू कृषी खाता' ह्या साधनामुळे शेतकऱ्यांना अचूक हिशोब ठेवणे सुलभ झाले आहे, असे ते म्हणाले. त्यांनी शेतकऱ्यांना आगामी खरीप हंगामाचा हिशोब डिजिटली ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आणि सर्वांनी डिजिटल शेती हिशोबाच्या कार्यशाळेचा आनंद घेतला.

# दिवंगत आ.संजय बंड यांना अभिवादन सोहळा आज

## प्रा. श्याम मानव यांची प्रबोधन सभेचेही आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )**- लोकनेते दिवंगत संजयभाऊ बंड (माजी आमदार) यांच्या जयंती निमित्त अभिवादन सोहळ्याचे आयोजन उद्या दि.27 सप्टेंबर 2024 रोजी ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सायं.6 वा. आयोजित करण्यात आले आहे.

त्यानिमित्याने महाराष्ट्र बचाओ- संविधान बचाओ अभियान अंतर्गत प्रा. श्याम मानव, संस्थापक संघटक, अ.भा.अंधश्रद्धा निर्मूलन समिती तथा ज्येष्ठ राजकिय विश्लेषक यांचे प्रबोधनपर व्याख्यान होणार आहे. या सभेमध्ये प्रा.श्याम मानव, भारतीय संविधानाला असलेले धोके, देशा समोर असलेली मोठी संकटे आपल्या पुढच्या पिढीला किती अंधारात नेत आहे. देशासोबतच राज्याची राजकीय स्थिती कशी. समाजात शेतकरी, युवक, बेरोजगारी, महागाई, शिक्षण व आरोग्याची स्थिती काय आहे, या सर्व बाबींचा अभ्यास पूर्ण विवेचन म्हणून या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अबालवृध्दांनी विद्यार्थ्यांनी व्याख्यानाची पर्वा न चुकता लोकशाही अबाधीत ठेवण्यासाठी या व्याख्यानाकरिता उपस्थित रहावे, असे आवाहन लोकनेते दिवंगत संजय बंड मित्र परिवारातर्फे करण्यात आली आहे.

# लाडक्या बहीणींकडून बहीणींचा घात

## महीला बचत गटात अपहार ? ■ लोकसंचालीत साधन केंद्राचाही सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट ( दि.26 )** - अचलपुर येथील उन्नती लोकसंचालीत साधन केंद्रांतर्गत पथ्रोट येथील गोमाता स्वंयसहाय्यता बचत गटातील 8 महिला सदस्यांनी व उन्नती सि.एम. आर.सी चे व्यवस्थापिका, सहयोगीनी ने ईतर 2 महीला सदस्यांना अंधारात ठेऊन बँकेकडुन कर्जाची उचल करुन हडपल्याचा प्रकार उजेडात आला.

आरोप आहे की, बचत गटांच्या नियम व अटीला कालबाह्य ठरवुन गोमाता स्वंयसहाय्यता बचत गटातील अध्यक्ष सविता मस्करे, सचिव भुवनेश्वरी दिपक टेहरे यांच्यासह 6 महिला सदस्या व उन्नती सि. एम.आर.सी चे व्यवस्थापिका मंजुषा राऊत, सहयोगीनी निर्मले ने इतर 2 महीला सदस्यांना अंधारात ठेवून बँकेकडून कर्जाची उचल करुन स्वत: रक्कम हडपल्याची तक्रार आशा दुर्बुडे, निलीमा कावरे यांनी स्थानीक पोलीस स्टेशन सह बालकल्याण विभाग, महीला आर्थीक विकास विभाग अमरावती यांच्याकडे केली आहे. याबाबत उन्नती सि.एम.आर.सी अचलपुरच्या व्यवस्थापिका मंजुषा राऊत यांच्याकडे विचारणा केली असता आमचा या प्रकरणाशी काही संबध नसुन त्यांनी हात वर केले आहे. सहयोगीनी निर्मले यांना विचारणा केल्यावर पथ्रोट येथील गोमाता स्वंयसहाय्यता बचत गटातील 8 महिला सदस्यांतील अध्यक्ष, सचिव व महीलांनी इतर 2 महीला सदस्यांना अंधारात ठेऊन बँकेकडुन कर्जाची उचल केली असल्याचे कबुल केले, तसेच माझ्यासमक्ष वाटप व्हायला पाहीजे होते, मात्र मी हजर नसताना वाटप केल्याचे सांगत मी सर्वांना रक्कम मिळवुन देण्याचा प्रयत्न करत असल्याचेही सांगितले.

> आम्हाला कर्ज मिळणार असल्याची बतावणी करुन सह्या घेतल्या. कर्जाची रक्कम बँकेकडुन आणुन सर्वांनी समान वाटून घेऊन एक महीना उलटुनही कुठलाच थांगपत्ता न लागु देता तुम्हाला बचत गटातुन काढुन टाकले असल्याचे बचतगट मधील अध्यक्ष, सचिव व इतर महीला सांगतात. मी पोलीसात तक्रार केली.
>
> **आशा ज्ञानदेव दुर्बुडे,**
> **बचत गटातील अन्यायग्रस्त महिला.**

> तुम्ही थकीत कर्जदार असल्याने तुम्हाला बचत गटातुन कमी केले, असे सांगीतले. मी कुठल्याही प्रकारचा राजीनामा दिला नसताना यांनी कुठल्या नियमाने कमी केले, हे कळले नाही. आम्ही दोघींनी पोलीस तक्रार केली आहे.
>
> **निलीमा कावरे,**
> **अन्यायग्रस्त महिला.**

# समोपचाराने तोडगा काढू-उपमुख्यमंत्री

## आरटीओ संघटनेकडून अजित पवारांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.26 )** - आरटीओच्या संपकरी कर्मचाऱ्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देत, कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबतची माहिती दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्याशी मुंबई येथे गेल्यानंतर लागलीच या विषयावर चर्चा करून सामोपचाराने तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

गेल्या तीन दिवसांपासून आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरु आहे. परंतू आतापर्यंत प्रशासनाकडून संप सोडविण्याकरिता कुठलेच पाऊल उचलण्यात आले नाही. ज्यामूळे आरटीओ कार्यालयाशी संबधित कामाकरिता येणाऱ्या नागरिकांना आल्या पावली परत जावे लागत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार गुरुवारी (दि.26) अमरावती दौऱ्यावर होते. दरम्यान मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांच्यासह संदीप खवले, गोपाल चिखलकर यांनी त्यांची भेट घेत आपले गाऱ्हाणे मांडले.

या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्याशी मुंबई येथे गेल्यानंतर लागलीच या विषयावर चर्चा करून सामोपचाराने तोडगा काढण्याचे आश्वासन यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.